दुर्मिळ गव्हाणी घुबडाला नवं जीवन >>पान 2

काल बालकांनी वर्कशॉप केले तर आज पालकांनी केले, ठाकरे बंधुंच्या वचननाम्यावर शिवसेना शिंदे गटाचा प्रहार >>पान 3

डोणगावमध्ये मोकाट कुत्र्यांची दहशत: पोलीस स्टेशनपर्यंत टोळक्याचा थैमान >>पान 4

**सुविचार**

आत्मचिंतन करीत राहणे हा महान शिक्षक होण्याचा मार्ग आहे.- डॉ. राधाकृष्णन


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 150 ■ सोमवार, दि. 05 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




अर्ध्यावरती डाव मोडला.. बॉलिवूडच्या प्रसिद्ध अभिनेता अन् अभिनेत्रीचा घटस्फोट आतील पान

## घरे भरणारे निवडून आले तर निधी पोहोचू शकणार नाही; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी : सकारात्मक कामे करून दाखवले आहेत. पाठीशी नरेंद्र मोदींसारखे सक्षम नेतृत्व आहे. निधीची कमतरता नाही. महापालिका पुन्हा आपल्याच लोकांच्या हातात आली पाहिजे. अन्यथा कितीही निधी दिला तरी घरे भरणारे निवडून आले, तर नरेंद्र मोदींचे 'व्हिजन', निधी तुमच्यापर्यंत पोहोचू शकणार नाही. देशात सात दशके राज्यकर्त्यांनी शहरी विकासाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केला.**

अकोल्यात महापालिका निवडणुकीतील भाजप उमेदवारांच्या प्रचाराचे रणशिंग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी जाहीर सभेतून फुंकले. यावेळी ते बोलत होते. पालकमंत्री आकाश फुंडकर, भाजप प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, प्रकाश भारसाकळे, हरीश पिंपळे, अमोल मिटकरी, माजी राज्यमंत्री डॉ. रणजित पाटील, डॉ. दशरथ भांडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते. टीका करण्यासाठी आलो नसून कोणाला दूषणं देणार नसल्याचे स्पष्ट करीत त्यांनी योजना व विकास कामांचा आढावा मांडला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''महाराष्ट्रातील ५० टक्के नागरिक शहरात राहतात. महापालिकेची निवडणूक ४० ते ४५ टक्के लोकांच्या जीवनावर परिणाम करणारी आहे. पूर्वी गावांचा विकास म्हणजे देशाचा विकास ही संकल्पना होती. सात दशके सत्ताधाऱ्यांनी शहरी विकासाकडे दुर्लक्ष केले. शहरांमध्ये प्रचंड समस्या निर्माण झाल्या. शहराची बकाल अवस्था तयार झाली. २०१४ साली



पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कारभार स्वीकारल्यावर गावासोबतच शहरी विकासाचा संकल्प घेतला. ६५ टक्के जीडीपी शहरात तयार होतो. रोजगार निर्मिती शहरातून होते. त्यामुळे शहरांचे नियोजन आवश्यक आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदा शहरांसाठी योजना सुरू केल्या. अनेक योजनांच्या माध्यमातून लाखो कोटी रुपये शहरांना दिले. त्यामुळे शहरे विकसित होत आहेत.''

२०१७ मध्ये अकोला महापालिकेची सत्ता भाजपकडे दिली होती. शहरात मोठ्या प्रमाणात कामे केली. हद्दवाढीनंतर विकास आराखडा तयार करून विकास कामे केली. महापालिकेच्या माध्यमातून विकास कामे पूर्णत्वाला गेली. हद्दवाढ क्षेत्रापर्यंत पाणी पुरवठा केला. वाढीव पाणीपुरवठा योजना २२१ कोटींची केली असून त्याचे काम सुरू केले. ५२१ कोटींचा आणखी एक टप्पा हाती घेतला जाणार आहे. भूमीगत गटार योजनेचे काम सुरू आहे. जलशुद्धीकरणाचे प्रकल्प हाती घेण्यात आले. सीसीटीव्हीचा प्रकल्प पूर्णत्वास जाणार आहे. न्यू तापडिया नगरच्या उड्डाणपुलासाठी ३७ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला जाईल. महापालिकेची नवीन इमारत तयार केली जाणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. सभेचे सूत्रसंचालन गिरीश जोशी आणि सिद्धार्थ शर्मा यांनी केले, तर आभार जयंत मसने यांनी मानले. सभेसाठी मोठी गर्दी उसळली होती.

## कैलास पर्वत मोदींनी बांधला, गंगाही त्यांनीच आणली त्याचे श्रेय; ठाकरेंची बोचरी टीका

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेसह २९ महापालिकांची निवडणूक १५ जानेवारीला पार पडली आहे. तर १६ जानेवारीला निकाल लागणार आहेत. दरम्यान राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या हस्ते, मनसे, शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या संयुक्त वचननाम्याचे मुंबईत प्रकाशन केले. यानंतर राज ठाकरेंनी सुरुवातीला निवेदन दिले, त्यानंतर उद्धव ठाकरेंनी भाजपवर आणि मोदींवर जोरदार टीका केली.

राज ठाकरे काय म्हणाले?

''इथे आलेल्या सगळ्यांचे मी स्वागत करतो. २० वर्षांनी राज ठाकरे आले म्हणाले, मला २० वर्षांनी सुटून आल्यासारखे वाटते आहे. मी खूप वर्षांनी शिवसेना भवनात आलो. नवीन शिवसेना भवन मी पहिल्यांदाच पाहतो आहे. माझ्या मनातल्या आठवणी जुन्या शिवसेना भवनातल्या आहेत. त्यामुळे कुठे काय होतं हेच मला समजत नाही. जुन्या



आठवणी आनंददायी आणि रोमांचकारी अशा वगैरे होत्या. त्या आठवणींबाबत तुमच्यासह बसलो तर इतक्या गोषअटी सांगत येतील. पण मी त्या आठवणींमध्ये रमत नाही. आज शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि राष्ट्रवादीचा जाहीरनामा प्रकाशित केला आहे.या वचननाम्यातल्या गोष्टी तुम्हाला आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरेंनी सांगितले आहेच.'' असं राज ठाकरेंनी म्हटले आहे.

राहुल नार्वेकर यांच्यावर उद्धव ठाकरेंची टीका

>> पान २

## राज्यातील आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांच्या सोबत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची दिल्लीत बैठक

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व गतिमान करण्यासाठी केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा व राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांची दिल्ली येथे महत्त्वपूर्ण आढावा संपन्न झाली. या बैठकीत राज्यातील राष्ट्रीय आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, सार्वजनिक आरोग्य पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करणे, आणि रुग्णकेंद्रित सेवा देणे बाबत चर्चा करण्यात आली. बैठकी दरम्यान नागरिकांना दर्जेदार व परवडणाऱ्या दरात औषधे सहज उपलब्ध व्हावीत, यासाठी प्रत्येक जिल्हा रुग्णालयात जनऔषधी केंद्र आणि अमृत फार्मसींचे जाळे राज्यात अधिक विस्तारण्याच्या सूचना केंद्रीय आरोग्य मंत्री यांनी दिल्या. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना रुग्णांवरील औषध खर्चाचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. क्षयरोग निर्मूलनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर मिशन मोडमध्ये विशेष रणनीती राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच तपासणी मोहीम व्यापक करणे, उपचारांमध्ये सातत्य राखणे आणि रुग्णांना पोषण सहाय्य देणे, निक्षय मित्र यांचे मार्फत फूड बास्केट देणे यावर विशेष भर देण्यात येणार आहे. राज्यातील क्षय रोगाच्या रुग्णांची एक्स-रे तपासणी वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या. केंद्र शासनामार्फत ९६ अतिरिक्त हॅन्ड हेल्ड एक्स-रे मशीन राज्याला देण्यात येणार आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या समन्वयातून राज्याच्या आरोग्य क्षेत्रातील उपक्रमांना गती देत लोकाभिमुख, सक्षम आणि विश्वासार्ह आरोग्य व्यवस्था उभारण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## ठाकरेंना मोठा धक्का! माजी महापौर शुभा राऊळांचा राजीनामा, भाजपमध्ये प्रवेश करणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** ऐन निवडणुकीच्या धामधुमीत उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेच्या मुंबईच्या माजी महापौर आणि शिव आरोग्य सेनेच्या अध्यक्षा शुभा राऊळ यांनी शिवसेना पक्षाचा राजीनामा दिला. शुभा राऊळ यांनी भाजप नेते आशिष शेलार यांची भेट घेतली असून त्या लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती आहे.

माजी महापौर शुभा राऊळ यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे राजीनामा पत्र दिलं आहे. त्यांनी शिव आरोग्य सेनेच्या अध्यक्षपदाचा आणि शिवसेनेच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा सुपूर्द केला आहे. शुभा राऊळ यांच्या नाराजीचं कारण अद्याप समोर आलं नाही. अगदी थोडक्या शब्दांमध्ये शुभा राऊळ यांनी पक्षाच्या प्राथमिक सदस्यपदाचा राजीनामा दिला. ठाकरेंची साथ



सोडल्यानंतर शुभा राऊळ आता भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती आहे.

शुभा राऊळ यांनी आमदार प्रवीण दरेकर यांच्या निवासस्थानी मंत्री आशिष शेलार यांची भेट घेतली. त्यानंतर शुभा राऊळ या भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचं निश्चित मानले जात आहे. शुभा राऊळ या ठाकरेंच्या शिवसेनेच्या एक मोठ्या महिला नेत्या मानल्या जातात. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी त्यांच्या युतीचा वचननामा जाहीर केला असताना त्याच दिवशी शुभा राऊळ यांनी राजीनामा दिल्याने तो ठाकरेंसाठी मोठा धक्का मानला जातोय.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी आज ठाकरे बंधूंनी 'शब्द ठाकरेंचा' हा वचननामा प्रसिद्ध केला. यामध्ये मुंबईकरांच्या आयुष्यावर मोठा परिणाम करणाऱ्या महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे. पाळणाघरे, पाळीव प्राणी, पाणी आणि सांडपाणी, रस्ते, कचरा व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, रोजगार यासह अनेक गोष्टी आहेत. हा वचननामा या महानगरपालिका निवडणुकीमध्ये गेमचेंजर ठरणार का अशी चर्चा सध्या सुरू आहे.

## नागपुरात 'एमईआरसी'ची वीज दारावर सुनावणी, अनेकांना बोलू दिले नाही

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** महावितरणने सादर केलेल्या बहुवर्षीय वीज दर आदेशाच्या पुनरावलोकन याचिकेवर महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने (एमईआरसी) शनिवारी सकाळी १०.३० वाजता नागपुरातील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात सुनावणी घेतली. या सुनावणीत सकाळी १०.३० नंतर आल्याचे कारण देत पाचहून अधिक जणांना बोलू दिले गेले नाही. असा कोणताही नियम नसताना नागरिकांना बोलू न देणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान असल्याचा आरोप महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स युनियनने केला. त्यामुळे ही सुनावणी वादग्रस्त ठरली.

उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर 'एमईआरसी'ने बहुवर्षीय वीज दर आदेशाच्या पुनरावलोकन याचिकेवर राज्यभरात जनसुनावणी सुरू केली आहे. नागपुरातील




शनिवारी झालेल्या सुनावणीपूर्वी 'एमईआरसी'कडे ८९ जणांनी आपली मते मांडण्याची तयारी दर्शवली होती आणि त्यांची नावे बोलणाऱ्यांच्या यादीत समाविष्ट होती. तसेच सुनावणीस्थळी सकाळी १०.३० पूर्वी आणखी १७ जणांनी बोलण्याची तयारी दर्शवल्याने त्यांची नावेही आयोगाकडे पाठवून त्यांनाही बोलण्याची संधी देण्यात आली. सुनावणी सुरू असताना सकाळी १०.३० नंतर ७ ते ८ जण सभागृहात उपस्थित झाले. मात्र, १०.३० नंतर आल्याचे कारण देत त्यांना बोलू दिले गेले नाही. यावर वीज क्षेत्रातील जाणकार महेंद्र जिचकार यांच्यासह इतरांनी आक्षेप नोंदवला.

जिचकार यांनी आयोगाचे अतिरिक्त संचालक (तांत्रिक) यांना १०.३० नंतर आलेल्यांना बोलू दिले जात नसल्यासंबंधीचा लेखी आदेश दाखवण्याची किंवा तो लेखी स्वरूपात देण्याची मागणी केली. मात्र, 'एमईआरसी'चे कोणतेही अधिकारी याबाबत ऐकण्यास तयार नव्हते. 'एमईआरसी'चे डॉ. प्रफुल्ल वऱ्हाडे यांनी जिचकार यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. नियमांबाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतर अखेरीस वऱ्हाडे यांनी जिचकार यांना पुढील सुनावणीत ऑनलाईन पद्धतीने सहभागी होण्याची विनंती केली.

## जनतेच्या विश्वासातून उभं राहिलेलं दाम्पत्य; मेहकरच्या इतिहासात सुवर्णक्षण

### मेहकरमध्ये भावनांचा इतिहास; पतीपत्नी एकाच दिवशी सत्तेवर




दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** मेहकर शहराच्या इतिहासात आज केवळ एक राजकीय घडामोड घडणार नाही, तर विश्वास, संघर्ष, निष्ठा आणि लोकसेवेच्या भावनेतून घडलेला ऐतिहासिक क्षण साकार होणार आहे. जनतेच्या प्रेमावर आणि विश्वासावर निवडून आलेले किशोर भास्करराव गारोळे आज नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारणार असून, त्याच दिवशी त्यांच्या पत्नी रूपाली किशोर गारोळे या नगरसेवक म्हणून शपथ घेणार आहेत. एकाच दिवशी, एकाच नगरपरिषदेत पतीपत्नी लोकप्रतिनिधी म्हणून पदभार स्वीकारत असलेला हा क्षण मेहकरसाठी अभिमानास्पद आणि भावनिक ठरणार आहे.

हा प्रवास सहज नव्हता. अनेक अडचणी, संघर्ष, टीका आणि राजकीय आव्हानांना सामोरे जात या दाम्पत्याने लोकसेवेचा मार्ग कधीही सोडला नाही. किशोर गारोळे यांनी आपल्या कार्यकाळात सर्वसामान्य नागरिकांशी असलेला थेट संवाद, विकासाभिमुख दृष्टिकोन आणि प्रशासनावर असलेली पकड यामुळे जनतेचा भक्कम विश्वास संपादन केला. तर रूपाली गारोळे यांनी घर, कुटुंब आणि समाज यांचा समतोल साधत महिलांसाठी प्रेरणादायी नेतृत्व उभे केले.

आज पदभार स्वीकारताना केवळ सत्तेची सूत्रे हाती येणार नाहीत, तर





मेहकरच्या प्रत्येक नागरिकाच्या आशा, अपेक्षा आणि स्वप्नांची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर असेल. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि मूलभूत नागरी सुविधांसोबतच संवेदनशील, पारदर्शक आणि लोकाभिमुख प्रशासन देण्याचा निर्धार या दाम्पत्याने व्यक्त केला आहे.

नगरपरिषदेच्या पदभार स्वीकृती सोहळ्यानिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण असून, कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिकांमध्ये आनंदाची लाट उसळली आहे. अनेकांच्या चेहऱ्यावर अभिमान तर काहींच्या डोळ्यांत आनंदाश्रू पाहायला मिळत आहेत. ''हे आमचेच लोक आहेत'' ही भावना आज मेहकरच्या प्रत्येक गल्ली-बोळातून उमटताना दिसत आहे. आजचा दिवस मेहकरसाठी नव्या नेतृत्वाचा नव्हे, तर विश्वासाच्या नात्याचा उत्सव ठरणार आहे. पतीपत्नीच्या या दुर्मिळ आणि भावनिक सत्तास्थापनेतून मेहकरच्या विकासाचा नवा अध्याय सुरू होणार असून, हा दिवस शहराच्या इतिहासात सोन्याच्या अक्षरांनी लिहिला जाईल, यात शंका नाही.

## महापालिका निवडणूक : कार्यकर्त्यांचा उद्रेक

महाराष्ट्रातील राजकीय वातावरण सध्या तापलेले आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विविध राजकीय पक्षांच्या इच्छुक उमेदवारांनी पक्ष नेतृत्वाविरोधात संताप व्यक्त केला आहे. खुद्द काही आमदारांचीही पक्षाकडून फसवणूक झाल्याची भावना आहे. राजकीय पक्षांना आपल्या विचारधारेवर आणि आपल्या पक्षाला यशस्वी करण्यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर विश्वास राहण्यापेक्षा पैसा आणि गुंडगिरी यांच्या मदतीने यश मिळू शकते हा जो विचार वाढत चालला आहे, त्याचा परिणाम सर्वसामान्यांच्या उद्रेकातून दिसून आला.

गेल्या काही दिवसांत नामांकन भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत व माघारीच्या मुदतीपर्यंत उच्च ताणतणाव पाहायला मिळाला. मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), ठाणे यासारख्या प्रमुख शहरांमध्ये पक्षांतर्गत बंडखोरीने जोर धरला आहे. इतर महानगरपालिकांमध्येही असाच कल दिसून येत आहे. यातून कार्यकर्त्यांच्या भावनांचा उद्रेक व राजकीय पक्षांच्या अंतर्गत लोकशाहीच्या ऱ्हासाचे चित्र स्पष्ट होत आहे. राज्यातील महानगरपालिका निवडणुकांसाठी नामांकन प्रक्रिया नुकतीच संपली असून, माघारीच्या शेवटच्या दिवशीही बंडखोर उमेदवारांनी अनेक ठिकाणी आपले अर्ज कायम ठेवले. नागपूर महापालिकेत भाजपच्या कार्यकर्त्यांनी उमेदवार किसन गावंडे यांना घरात बंद करून माघार घेण्यापासून रोखले. येथे तिकीट वाटपावरून स्वतंत्र उमेदवारी दाखल करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. शिस्तबद्ध कार्यकर्त्यांच्या नागपूरातील भाजपमध्ये असंतोष इतका वाढला की, कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालयात तोडफोड केली आणि नेत्यांविरोधात घोषणाबाजी केली. येथील निवडणुकीत बंडखोरांची भूमिका अंतिम लढाईचे चित्र बदलू शकते. मुंबई महानगरपालिकेत सर्वच पक्षांना बंडखोरीचा फटका बसला आहे. शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि मनसेतील काही नेत्यांनी तिकीट न मिळाल्याने पक्ष सोडला. भाजपमध्येही मोठी अंतर्गत बंडखोरी दिसून आली, ज्यात कार्यकर्त्यांनी रडत रडत आंदोलने केली. मुंबईत नामांकनाच्या शेवटच्या दिवशी पक्ष कार्यालयात हाणामारी व तोडफोडीच्या घटना घडल्या. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) व अजित पवार पक्षातही असंतोष आहे. राष्ट्रवादी (शरद पवार) ने उमेदवारांची यादी जाहीर केली, तरीही काही इच्छुकांनी अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली. मुंबईत बंडखोरांना शांत करण्यासाठी पक्षश्रेष्ठींनी बैठकांचा धडाका लावला, पण अनेकांनी माघार घेण्यास नकार दिला. पुणे महानगरपालिकेतही परिस्थिती काही वेगळी नाही. येथे भाजप व अजित पवार राष्ट्रवादीत आयात उमेदवारांमुळे स्थानिक कार्यकर्त्यांत असंतोष पसरला. हडपसर विभागात १२ जागांसाठी ३४८ नामांकने दाखल झाली, ज्यात बंडखोरांची भूमिका महत्त्वाची आहे. यातील किती जणांनी माघार घेतली ते सायंकाळपर्यंत समजू शकले नव्हते. निवडणूक कर्मचाऱ्यांचा सुस्तपणा या प्रकारात अधिक त्रासदायक ठरत आहे. कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालयात घुसून नेत्यांना घेराव घातला व तिकीट वाटपावरून आरोप केले. शिवसेना व काँग्रेसमध्येही काही नेत्यांनी पक्ष सोडून अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला. पुण्यात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार चेस आणि नाट्यामय घटना घडल्या. नाशिक, छत्रपती संभाजीनगर व ठाणे येथेही पक्षांतर्गत कलह उफाळून आला. नाशिकमध्ये प्रमुख पक्षांना कार्यकर्त्यांच्या आंदोलनाचा सामना करावा लागला, ज्यात कार्यालयात तोडफोड झाली. छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजप व शिवसेनेत तिकीट वाटपावरून बंडखोरी झाली. ठाणे महानगरपालिकेत विरोधकांनी नामांकन नाकारण्यावरून अधिकाऱ्यांवर पक्षपातीपणाचा आरोप केला. येथे काही उमेदवारांनी पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात प्रवेश केला. राज्यातील इतर महानगरपालिका जसे की ठाणे, पिंपरी-चिंचवड, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार, नवीन मुंबई, सोलापूर, मीरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर, अमरावती, नांदेड, कोल्हापूर, उल्हासनगर, सांगली-मिरज-कुपवाड, मालेगाव, जळगाव, अकोला, लातूर, धुळे, अहमदनगर, चंद्रपूर, परभणी, इचलकरंजी, जालना, अंबरनाथ येथेही कमी-अधिक प्रमाणात असंतोष दिसून आला. काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली, तर काहींनी पक्ष बदलला. राज्यभरात भाजपला सर्वाधिक बंडखोरीचा सामना करावा लागला, ज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरिष्ठ नेत्यांना बंडखोरांना शांत करण्यासाठी पाठवले. या बंडखोरीच्या मागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. सर्व राजकीय पक्षांमध्ये उमेदवारीची निर्णय प्रक्रिया ही कोणीतरी आपला लाडका इतरांवर लादण्याच्या जो प्रयोग नेते करत आहेत. इलेक्टिव्ह मेरिटच्या नावाखाली पैसेवाल्यांचा व गुंड गुन्हेगार यांचा जसा शिरकाव झाला आहे, त्या काळात कार्यकर्त्यांना केवळ सतरंजी उतरणे हेच काम राहिले आहे, असा आता सर्वसामान्यांचा समज झाला आहे. कोणताही राजकीय पक्ष त्याला अपवाद नाही. सर्वच पक्षात दरबारी राजकारण वाढत चालल्याने कार्यकर्त्यांना व पक्षाचा विचार जपणाऱ्या कार्यकर्ते मतदारांचा भ्रमनिरास होत आहे. गेली जवळपास दहा वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नाहीत, त्यामुळे इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. वर्षानुवर्षे कामे करूनही डावलले गेल्यानंतर त्यांच्या भावनांचा उद्रेक होणे स्वाभाविक आहे. मात्र या भावनेचा लोकांवर परिणाम होऊ नये म्हणून समाज माध्यमांवर जे विनोद पसरवले गेले, विशेष करून एकाच वेळी अनेकांना देशसेवेची आणि समाजसेवेची इतकी उकळी फुटण्याचे कारण काय? अशा प्रश्नांनी सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या जखमेवर मीठ चोळले गेले आहे. राजकीय पक्षांना आपल्या विचारधारेवर व आपल्या पक्षाला यशस्वी करण्यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर विश्वास राहण्यापेक्षा पैसा व गुंडगिरी यांच्या मदतीने यश मिळू शकते हा जो विचार वाढत चालला आहे, त्याचा परिणाम सर्वसामान्यांच्या उद्रेकातून दिसून आला. अर्ज माघारीच्या अखेरच्या दिवशी फार मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते माघार घेतील असे नाही, मात्र या लोकांना ही निवडणूक तितकी सोपीही राहिलेली नाही. अशा स्थितीत भक्कम जनमत त्यांना मिळेल का हाच खरा प्रश्न आहे. राजकीय पक्षातील संपत चाललेली लोकशाही, कार्यकर्त्यांचा विचार घेऊन त्यांच्या भावना जाणून घेऊन त्यांच्या बैठकीत उमेदवारी निश्चित करणे हे प्रकार जाऊन अचानक एक यादी प्रसिद्ध करण्याच्या नव्या फॉर्मुल्याने हे प्रश्न निर्माण केले आहेत. यातून व्यक्ती, जात, धन व मनगटशाही केंद्रित राजकारणाला चालना मिळणार आहे. त्यामुळे या बंडखोरीकडे वेगळ्या पद्धतीने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

# दुर्मिळ गव्हाणी घुबडाला नवं जीवन

## वन्यजीव सोयरे परिवाराच्या प्रयत्नांना यश

दैनिक आपला विदर्भ





**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील उमाळा परिसरात अतिशय दुर्मिळ असा गव्हाणी घुबड जखमी अवस्थेत आढळून आल्याची घटना समोर आली असून, शेतकऱ्याच्या सतर्कतेमुळे आणि वन्यजीव सोयरे परिवाराच्या वेळेवर केलेल्या उपचारांमुळे या दुर्मिळ पक्ष्याला नवे जीवन मिळाले आहे. या घटनेमुळे वन्यजीव संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जागृतीचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

बुलढाणा तालुक्यातील उमाळा येथील एका शेतात काम करत असताना स्थानिक शेतकऱ्याला जमिनीवर पडलेला आणि हालचाल न करणारा एक पक्षी आढळून आला. निरीक्षण केल्यानंतर हा पक्षी जखमी असल्याचे लक्षात येताच शेतकऱ्याने तात्काळ बुलढाण्यातील वन्यजीव सोयरे नितीन श्रीवास्तव यांच्याशी संपर्क साधला.

माहिती मिळताच वन्यजीव सोयरे पथकाने कोणताही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. पथकाने जखमी पक्ष्याची पाहणी केली असता तो अतिशय दुर्मिळ गव्हाणी घुबड असल्याचे निष्पन्न झाले. या घुबडाला शरीरावर गंभीर जखमा झाल्या होत्या. त्यानंतर या घुबडाला सुरक्षित ठिकाणी हलवून तब्बल आठवडाभर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपचार करण्यात आले. औषधोपचार, योग्य आहार आणि विशेष काळजीमुळे घुबडाची प्रकृती हळूहळू सुधारू लागली.

संपूर्णपणे बरे झाल्यानंतर या दुर्मिळ गव्हाणी घुबडाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. मुक्ततेच्या वेळी वन्यजीव सोयरे पथकातील सदस्य उपस्थित होते. घुबडाने उंच भरारी घेत आकाशात झेप घेताच सर्वांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले.

गव्हाणी घुबड हा अत्यंत दुर्मिळ पक्षी असून तो प्रामुख्याने रात्री सक्रिय असतो. सामान्यतः हा पक्षी अरब देशांमध्ये आणि मध्य आशियाई भागात आढळतो. भारतात त्याचे दर्शन फारच क्वचित होत असल्याने हा प्रकार वन्यजीव अभ्यासकांसाठी आणि निसर्गप्रेमींसाठी महत्त्वाचा मानला जात आहे.

वन्यजीव सोयरे परिवाराने या घटनेतून नागरिकांनी जखमी किंवा संकटात सापडलेल्या वन्यप्राण्यांची माहिती त्वरित संबंधित यंत्रणेला द्यावी, असे आवाहन केले आहे. शेतकऱ्याच्या जागरूकतेमुळे आणि वन्यजीव सोयरे पथकाच्या अथक प्रयत्नांमुळे एका दुर्मिळ पक्ष्याचे प्राण वाचले, ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

## उद्धव ठाकरेंनी मला शिवी नाही दिली, प्रत्येक मराठी माणसाला शिवी दिली, मराठी माणसाचा अपमान केला : अमित साटम

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईचे ममदानीकरण होऊ देणार नाही, अशी टिप्पणी मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी प्रचारसभेतून केली. या टीकेला उत्तर देत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना विचारण्यात आले असता त्यांनी कोणतीच प्रतिक्रिया हा कोण चाटम? असे म्हणत खिल्ली उडवली. यानंतर अमित साटम यांनी उद्धव ठाकरे यांनी मला शिवी नाही दिली, तर प्रत्येक मराठी माणसाला शिवी दिली. मराठी माणसाचा अपमान केला. मी सामान्य कुटूंबातून आलो आहे, कोणाच्या आशीर्वादाने आलो नाही, अशी प्रतिक्रिया दिली. शिवसेना भवनात आज (४ डिसेंबर) ठाकरे बंधूंच्या हस्ते शब्द ठाकरेंचा म्हणत वचननामा प्रसिद्ध करण्यात आला. यावेळी बोलताना उद्धव आणि राज यांनी मुंबईच्या विकासावर मुद्दे मांडताना भाजपवर तोफ डागली. दोघांची संयुक्त पत्रकार परिषद पार पडल्यानंतर भाजपकडून अमित साटम यांनी पत्रकार परिषद घेत टीका केली. अमित साटम म्हणाले, त्यांचा महापौर झाला तर महाराष्ट्रचा पाकिस्तान होईल. राज ठाकरे यांचे कार्यकर्ते ज्या प्रमाणे मारामारी करतात त्यामुळे संस्कृती खालावत आहे. मुंबईकरांचा निर्णय पक्का आहे. येणाऱ्या निवडणुकीत भगवा फडकणार असून महायुतीचा महापौर बसणार आहे. पुढील वर्षी गणपतीला हे दिसणार नाहीत, दिवाळीला एकत्र दिसणार नाहीत. मराठी माणसासाठी २५ वर्षात उद्धव मामुने केलेलं एक तर काम दाखवावं, आम्ही १० काम दाखवतो. बीडीडी चाळीत आम्ही लोकांना घर दिलं. तुम्ही मातोश्री २ बनवले, अशी टीका साटम यांनी केली.

दरम्यान, उद्धव ठाके म्हणाले की, मुंबई महापालिकेच्या ठेवी सुमारे ९२ हजार कोटींपर्यंत नेल्या होत्या. कोस्टल रोड याच पैशातून बांधण्यात आला. मुख्यमंत्र्यांचे 'ठेवी चाटायला नसतात' हे विधान अशोभनीय आहे. ठेवी या कॉन्ट्रॅक्टरचे बूट चाटून त्यांना वाटायलाही नसतात. सध्या महापालिकेचे साधारणत: १५ हजार कोटींचे बजेट आहे, पण कॉन्ट्रॅक्टरना ३ लाख कोटींचे देणं करून ठेवले आहे.

## धक्कादायक! दुकानदार एकटा पाहिला अन् उपसले कोयते; पुण्यात भरदिवसा साडेपाच मिनिटांत लाखोंचा 'गेम'

**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात पुन्हा एकदा कोयता गँगची दहशत पाहायला मिळाली. पुण्यातील मांजरी परिसरात दिवसाढवळ्या भरबाजारात पडलेल्या दरोड्याने व्यापाऱ्यांमध्ये मोठी घबराट पसरली आहे. पुणे-सोलापूर महामार्गावरील शेवाळवाडी येथे 'महावीर ज्वेलर्स' या सराफा दुकानावर चार सशस्त्र दरोडेखोरांनी हल्ला चढवत लाखो रुपयांचे दागिने लंपास केले.

ही घटना काल (शनिवारी) सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. जेव्हा दुकानाचे मालक एकटेच उपस्थित होते, तेव्हा चार तरुण हातात लांब आणि धारदार कोयते घेऊन दुकानात घुसले. मालक एकटे असल्याचे पाहून दरोडेखोरांनी त्यांना कोयत्याचा धाक दाखवला. ''जर आरडाओरडा केला तर जागच्या जागी संपवून टाकू,'' अशी धमकी देत दरोडेखोरांनी दुकानातील दागिन्यांची लूट सुरू केली.

दरोडेखोरांच्या हातात जीवघेणी हत्यारे असल्याने घाबरलेले सराफ मालक प्रतिकार करू शकले नाहीत. अवघ्या काही मिनिटांत दरोडेखोरांनी दुकानातील सोन्याचे दागिने पिशव्यांमध्ये भरले आणि दुचाकीवरून वेगाने पसार झाले. या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. भरवस्तीत झालेल्या या धाडसी चोरीमुळे पोलिसांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

घटनेची माहिती मिळताच मांजरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. हा सर्व थरार दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. पोलिसांनी या फुटेजच्या आधारे तपासाची चक्रे फिरवली असून अज्ञात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळाची पाहणी केली. दरोडेखोरांनी पळून जाण्यासाठी वापरलेल्या मार्गावरील इतर सीसीटीव्ही फुटेजही पोलीस खंगाळत आहेत. दरम्यान, भरवस्तीत आणि मुख्य महामार्गालगत असलेल्या दुकानावर अशा प्रकारे सशस्त्र दरोडा पडल्यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

पान १ वरून...

## कैलास पर्वत मोदींनी बांधला

''बोलण्यासारखं बरंच काही आहे. एकूणच जी काही झुंडशाही सुरु झाली आहे कारण याला लोकशाही म्हणता येणार नाही. आम्ही त्यांची मतचोरी पकडली त्यानंतर आता उमेदवारांची पळवापळवी सुरु केली. एवढे निगरगट्ट आणि कोडगे राज्यकर्ते महाराष्ट्राला लाभले नव्हते. बिनविरोध निवडणूक हा लोकशाही आणि जनतेचा अपमान आहे. राहुल नार्वेकर यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन दमदाटी केली. संरक्षण काढायचा आदेश देतो आहे. हा विषय निवडणूक आयोगाने गांभीर्याने घेतला पाहिजे आणि त्यांना निलंबित केलं पाहिजे.'' अशी मागणी उद्धव ठाकरेंनी केली.

''मोदींनी कैलास पर्वत बांधला, समुद्रमंथन केले..''

''आम्ही मुंबईसाठी खूपच छोट्या गोष्टी केल्या आहेत. त्याचे श्रेय तुम्ही कशाला घेता? आम्ही साधीच कामे केली आहे. ती आम्ही होर्डिंगवर दाखवतो आहे. साधे कोस्टल रोडचे काम केलेय, मध्य वैतरणाचे काम केले आहे, करोना काळात कामे केली आहेत. आमच्या कामांचे श्रेय घेण्यापेक्षा त्यांनी जी कामं केली आहेत, म्हणजे मोदींनी कैलास पर्वत बांधला, स्वर्गातून गंगा आणली आहे. मिंधेनी समुद्र तयार केला आहे याचे श्रेय मागे पडतेय. रिगलच्या इथे जो बाळासाहेबांचा पुतळा उभारण्यात आला ती जागा मी निवडली होती. त्याचा खर्चही आम्ही केला. तरीही श्रेय मिंधे घेतो आहे. कैलास पर्वत मोदींनी बांधला हे का सांगत नाही? अरबी समुद्र मिंधे आणि फडणवीसांनी बांधले, समुद्र मंथन करुन ते शिवस्मारक कधी आणणार? एकनाथ शिंदे-मिंध्यांना आणि फडणवीसांना कुणी ओळखत नव्हते तेव्हापासून आम्ही कोस्टल रोडचे प्लानिंग केलंय. ही कामं साधी आहेत. त्यापेक्षा कैलास पर्वत मोदींनी आणला, स्वर्गातून गंगा आणली याचं श्रेय घ्या. आमच्या कामांचे श्रेय घेताना हे मागे पडते आहे. '' असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

# संतपरंपरेमुळे भारताच्या संस्कृतीची जागतिक पातळीवर वेगळी ओळख : मुख्यमंत्री फडणवीस

## कांदिवली येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संतमत अनुयायी आश्रम आयोजित भंडारा व महाप्रसाद कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** सामाजिक आणि शैक्षणिक कार्य आणि समाजप्रबोधनाचा वारसा संतांनी वर्षानुवर्षे जपला आहे. संतपरंपरेमुळेच भारताची जगात ऐतिहासिक ओळख निर्माण झाली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

कांदिवली (पूर्व) येथील संतमत अनुयायी आश्रम, सिंह इस्टेट येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संतांनी आपल्या प्रबोधनातून समाजाची सर्वांगीण प्रगती साधली आहे. संतांच्या विचारांमधून सामाजिक व शैक्षणिक कार्याला दिशा मिळाली. संतमत परंपरेत मानवसेवा, समता, प्रेम व सद्भावना ही केवळ तत्त्वे नसून ती प्रत्यक्ष आचरणात आणण्याची जीवनपद्धती आहे. या मूल्यांच्या प्रसारासाठी श्री सद्गुरु शरणानंदजी महाराज परमहंस यांच्या अनुयायांच्या माध्यमातून संतमत अनुयायी आश्रमाद्वारे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य सुरू आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, संतमत अनुयायी आश्रमांचे कार्य समाजाला सेवेकडे आणि प्रेमाकडे नेणारे आहे. मानवसेवा, समता, प्रेम व सद्भावना या मूल्यांच्या जपणुकीसाठी आश्रमाचे योगदान अमूल्य असून, हेच संतमत परंपरेचे खरे स्वरूप आहे.

संतमत परंपरेतील परमहंस महाराजांनी जात-पात व भेदभावाला विरोध करून मानवधर्म प्रधान मानला. त्यांनी आत्मज्ञान, अहंकार,त्याग व मानवसेवेचा संदेश दिला. भारतीय संस्कृतीतील गीता ही केवळ विचारधारा नसून, संस्कृती व सभ्यता जपत उत्तम जीवन जगण्याचा मार्ग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भारतीय संस्कृती जपण्याचे महान कार्य संतपरंपरेने केले आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

यावेळी माजी मंत्री कृपाशंकर सिंह, माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार अमित साटम, आमदार अतुल भातखळकर, आमदार प्रवीण दरेकर, संतमत अनुयायी आश्रम ट्रस्टचे सचिव राधेश्याम यादव यांच्यासह मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होते.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## पोलीस कर्मचारीच ठाकरेंच्या उमेदवाराला घेऊन शिंदेंच्या बंगल्यावर, व्हिडीओ दाखवत अविनाश जाधव यांचा गंभीर आरोप

**ठाणे/प्रतिनिधी** : ठाण्यात शिंदे गटाचे काही नगरसेवक बिनविरोध निवडून आल्यानंतर आता ठाकरे गट आणि मनसेकडून भाजप – शिंदे गटावर गंभीर आरोप केले जात आहे. एक पोलीस कर्मचारी आम च्या उमेदवाराला घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थांनी नेत असल्याचा गंभीर आरोप म नसेचे नेते अविनाश जाधव यांनी केला. तसेच त्याचे व्हिडीओ पत्रकार परिषदेत दाखविले. त्यामुळे ठाण्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

ठाणे महापालिकेत शिवसेना (ठाकरे गट), मनसे आणि राष्ट्रवादीची (शरद पवार गट) आघाडी आहे. ठाण्यातील शिंदे गटाचे काही उमेदवार बिनविरोध निवडून आल्यानंतर रविवारी ठाकरे गटाचे नेते राजन विचारे, मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजप आणि शिंदे गटावर टीका केली.

ठाण्यात नितीन कंपनी परिसरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निवासस्थान आहे. या निवासस्थानाबाहेरील एक चित्रीकरण अविनाश जाधव यांनी माध्यमांसमोर सादर केले. यामध्ये ठाकरे गटाचे उमेदवार विक्रांत घाग यांना एक पोलीस कर्मचारी एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी घेऊन जात असल्याचा दावा अविनाश जाधव यांनी केला. या उमेदवाराला शिवसेनेकडून (ठाकरे गट) उमेदवारी मिळाली होती. असे असतानाही त्यांना एकनाथ शिंदे यांच्या निवावस्थानी का नेले जात होते, याची चौकशी व्हायला हवी अशी मागणी अविनाश जाधव यांनी केली. ही निवडणूक पैशांनी आणि पोलीस दबावाखाली घेतली जात आहेत असा आरोपही त्यांनी केला.

निवडणूक अधिकारी बदलले नाही तर रस्त्यावर

ठाण्यातील दोन निवडणूक अधिकारी येत्या दोन दिवसांत बदलले नाही. तर आम्ही त्याचा तीव्र विरोध करुन रस्त्यावर उतरू असा इशारा अविनाश जाधव यांनी दिला आहे. निर्णय मिळत नाही तो पर्यंत आम्ही थांबणार नाही असेही ते म्हणाले.

बिनविरोधसाठी अधिकारी, पैशांचा वापर

आमचे अर्ज बाद करण्याचे अर्धे काम अधिकाऱ्यांनी, पोलिसांनी आणि अर्धे काम पैशांनी करण्यात आल्याचा आरोप ठाकरे गटाचे नेते राजन विचारे यांनी केला. म हापालिकेत लुटालूट सुरु आहे. ठाणे शहर वाचवायचे असेल तर जनतेने विचार करून यांना खाली आणले पाहिजे. जनतेने मतदान करुन या दरोडेखोरांना घरी बसवा असेही विचारे म्हणाले.

## अर्ध्यावरती डाव मोडला.. बॉलिवूडच्या प्रसिद्ध अभिनेता अन् अभिनेत्रीचा घटस्फोट; १५ वर्षांच्या संसाराला पूर्णविराम

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : २०२५ या साली अनेक सेलिब्रिटींनी काडीमोड घेतला. काहींचे लग्न मोडले. अनेकांनी वैयक्तिक आयुष्यात सुरू असलेल्या वादळाची माहिती चाहत्यांना देत राहिले. गेल्या वर्षी अभिनेता जय भानुशाली आणि अभिनेत्री माही विज लवकरच विभक्त होणार असल्याची चर्चा होती. या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. प्रसिद्ध टीव्ही जोडी माही विज आणि जय भानुशाली यांनी अखेर घटस्फोटाबाबत माहिती दिली. त्यांनी परस्पर सहमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचे १४ वर्षांचे वैवाहिक जीवन संपुष्टात आले आहे. ही बातमी समोर आल्यानंतर चाहते भावूक झाले आहेत. गेल्या काही काळापासून त्यांच्या विभक्त होण्याच्या अफवा पसरत होत्या. या चर्चांवर आता दोघांनी पूर्णविराम दिला आहे. या बातमीनंतर सिनेसृष्टीत खळबळ उडाली आहे.

# काल बालकांनी वर्कशॉप केले तर आज पालकांनी केले, ठाकरे बंधुंच्या वचननाम्यावर शिवसेना शिंदे गटाचा प्रहार

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, मनसे आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा वचननामा जाहीर करण्यात आला आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत हा वचननामा जाहीर केला आहे. यावरुन शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि माजी खासदार राहुल शेवाळे यांनी टीका केलीय. शिवसेनेला वेदना देईल असा वचननामा आहे. त्यांनी हिंदू, मराठी हे शब्द वगळले आहेत. त्यांचा मागचा वचननामा पहिला तर त्यात सगळे शब्द आहेत. यांचा शब्द भ्रष्टाचार मतलब आणि तिजोरी लुटण्याचा आहे. वंदनीय हिंदूहृदय सम्राट हे शब्द वापरले नाहीत. त्यांनी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे असा उल्लेख केलाआहे. जन्मशताब्दी वर्षीच यांनी बाळासाहेब ठाकरे यांचा अपमान केल्याची टीका शेवाळे यांनी केली. काल बालकांनी वर्कशॉप केलं आणि आज पालकांनी केल्याचा टोला देखील शेवळेंनी लगावला.

**बाळासाहेब ठाकरे यांची फसवणूक केलेला हा जाहीरनामा**

बाळासाहेब ठाकरे यांची फसवणूक केलेला हा जाहीरनामा असल्याची टीका राहुल शेवाळे यांनी केली. काल बालकांनी वर्कशॉप केलं आणि आज पालकांनी केलं आहे. वर्कशॉप हा इंग्रजी शब्द वापरला आहे. बॉंबे स्कॉटिश शाळेचा जास्त प्रभाव या वचननामामध्ये आहे. यामध्ये ४० टक्के इंग्रजी शब्द यांनी वापरल्याचे राहुल शेवाळे म्हणाले. आज शिवसेना भवन इथं उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत त्यांनी मुंबई महापालिकेसाठीचा वचननामा जाहीर केला आहे.

**मुख्यमंत्री होते तरी २०१७ ला दिलेली आश्वासने यांनी पूर्ण केली नाहीत**

एकीकडे मराठी भाषेचा उल्लेख आणि दुसरीकडे दुसऱ्या भाषेचा उल्लेख केला तर कानाखाली मारेल म्हणतात आता कुणाच्या कानाखाली ते मारणार आहेत? असा सवाल शेवाळे यांनी उपस्थित केला. स्वत: मुख्यमंत्री होते तरी २०१७ ला दिलेली आश्वासने यांनी पूर्ण केली नाहीत. कायम भावनिक आवाहन करत आहेत. कोळीवाडा गावठाणची बांधकामे रेग्युलर करायची आहेत, यांनी मागच्या ८ वर्षात हे केलेले नाही. मुख्यमंत्री असताना हे करायचं होतं असे शेवाळे म्हणाले. निवडणूक आयोगाने कारवाई केली तरी हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरेच आम्ही म्हणणार. आम्ही मागे हटणार नाही. मागच्या वाचनाम्यातील अनेक गोष्टी यांनी परत घेतल्या आहेत असे शेवाळे म्हणाले.

## फक्त १५० रुपयाची वस्तू, पण किंमत मोजावी लागली जिवाने! रेडियम नसलेल्या त्या काळरूपी ट्रॅक्टरने घेतला तरुणाचा जीव

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील कवठे येमाई परिसरात अष्टविनायक महामार्गावर एक भीषण अपघात झाला आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या उभ्या ट्रॅक्टरला दुचाकीची जोरात धडक बसून लाखणगाव येथील एका २४ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी अंत झाला.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, कपिल किशोर वारे (वय २४, रा. लाखणगाव, ता. आंबेगाव) हे शुक्रवारी रात्री ११:३० च्या सुमारास अष्टविनायक महाम ार्गावरून आपल्या दुचाकीने घरी निघाले होते. यावेळी कवठे येमाई हद्दीत ऊस वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टरच्या ट्रॉलीचे चाक पंक्चर झाल्याने चालकाने ट्रॅक्टर रस्त्यावरच उभा केला होता. रात्रीचा अंधार असल्याने उभ्या असलेल्या ट्रॅक्टरचा अंदाज कपिल यांना आला नाही आणि त्यांची दुचाकी थेट ट्रॉलीच्या मागील भागावर जाऊन आदळली.

ही धडक इतकी भीषण होती की, कपिल यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि प्रचंड रक्तस्राव झाल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात त्यांच्या दुचाकीचाही चक्काचूर झाला आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली, मात्र तोपर्यंत उशीर झाला होता.

सध्या साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू असल्याने अष्टविनायक महामार्गावर ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉलींची मोठी वर्दळ असते. अनेकदा हे ट्रॅक्टर रस्त्याच्या मध्यभागी किंवा कडेला उभे केले जातात. अशा उभ्या वाहनांना रिफ्लेक्टर किंवा रेडियम नसल्यामुळे रात्रीच्या वेळी मागून येणाऱ्या वाहनचालकांना धोका निर्माण होतो. कपिल वारे यांच्या मृत्यूमुळे ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या सुरक्षिततेचा आणि नियमांच्या अंमलबजावणीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## कल्याणमध्ये भाजपच्या माजी नगरसेवकासाठी अधिकृत उमेदवाराने उमेदवारी अर्ज घेतला मागे

**कल्याण/प्रतिनिधी** : कल्याण पश्चिमेतील पॅनल क्रमांक ७ ड मध्ये भाजपच्या डॉ. प्रमोद उपाध्याय यांना भाजपने एबी अर्ज देऊन त्यांची या प्रभागातून अधिकृत उमेदवारी जाहीर केली होती. परंतु, आपल्या प्रभागात भाजपचे म ाजी नगरसेवक संदीप गायकर हे उमेदवारी न मिळाल्याने अपक्ष म्हणून निवडणूक लढवित आहेत. तेच पक्षाचे अधिकृत उमेदवार आणि प्रभागातील प्रबळ दावेदार असल्याचे मत व्यक्त करून भाजपचे अधिकृत उमेदवार डॉ. प्रमोद उपाध्याय यांनी माजी नगरसेवक संदीप गायकर यांच्यासाठी आपला उमेदवारी अर्ज प्रभाग क्रमांक सात ड मधून मागे घेतला आहे. संदीप गायकर यांना आपले समर्थन जाहीर केले आहे. पालिका निवडणुकांमध्ये एकीकडे स्वत:लाच उमेदवारी मिळावी म्हणून पक्ष नेते, पदाधिकाऱ्यांना वेठीस धरण्याचे अनेक प्रकार गेल्या काही दिवसांमध्ये घडले. एबी अर्जाच्या नक्कल प्रती जोडून पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज भरले. असे प्रकार सुरू असताना कल्याणमध्ये भाजपमध्ये पक्षाच्या माजी नगरसेवकासाठी अधिकृत उमेदवाराने स्वत:हून आपल्या उमेदवारी मागे घेतल्याचे पहिलेच उदाहरण समोर आले आहे.

कल्याण पश्चिमेतील प्रभाग क्रमांक सात ड मध्ये घडलेली ही घटना राज्यातील पहिलीच घटना आहे, असा दावा भाजप पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

'प्रथम राष्ट्र, मग पक्ष आणि त्यानंतर स्वत' हे भारतीय जनता पक्षाचे घोषवाक्य. या घोषवाक्याप्रमाणे आपण ही कृती केली आहे, असे उमेदवारी अर्ज मागे घेतलेल्या डॉ. प्रमोद उपाध्याय यांनी सांगितले. ज्या व्यक्तीमुळे आपण आज भाजपात आहोत, ज्या व्यक्तीने आपल्याला पक्षाचे पहिले पद दिले, तीच व्यक्ती निवडणुकीच्या रिंगणात नसल्याची खंत डॉ. पंकज उपाध्याय यांना वाटत होती.

# डोणगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) मध्ये युवकांचा प्रवेश


दैनिक आपला विदर्भ





**डोणगाव/प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्या विचारधारेवर विश्वास ठेवून डोणगाव येथील असंख्य युवकांनी पक्षात जाहीर प्रवेश केला. माजी मंत्री डॉ. राजेंद्रजी शिंगणे व भास्करराव काळे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत हा प्रवेश सोहळा पार पडला. प्रदेश सचिव पंकज पळसकर, मेहकर तालुका कार्याध्यक्ष संजू गायकवाड, रवी वाघटकर, मेहकर युवक तालुकाप्रमुख शाम पांडव, डोणगाव शहर प्रमुख विजय भाऊ सरकटे तसेच युवक तालुका कार्याध्यक्ष अर्जुन पवार यांच्या उपस्थितीत युवकांचा पक्षप्रवेश झाला. पक्षात प्रवेश करणाऱ्या युवकांमध्ये अनिल खोडके, अंकुश बाजड, धनंजय मिसाळ, पवन निकस, आदित्य पळसकर, प्रवीण डहाळे, अनिस पठाण, प्रशांत सोनुने, राहुल बाजड, सुशांत भारस्कर, शिवम बाजड, नामदेव पांडव व संजय येवतकर यांचा समावेश आहे. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी युवकांचे स्वागत करून राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) युवकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत असल्याचे सांगितले. या प्रवेशामुळे डोणगाव परिसरात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## शब्दकोडे क्र. 54



आडवे शब्द

१. मागाहून, मग ३. कथांमधील भला मोठा नाग ६. सापाची एक जात ९. तळे, धरण, विहीर इ. ११. एक मंगल वाद्य १३. वागणूक १४. परमेश्वर १५. मोठा डेरेदार वृक्ष १८. विल्हेवाट, निकाल (लावणे) १९. अंगावरील बारीक केस २२. कबूतर २३. चंद्र, एक वनस्पती २५. मुलगा-मुलगी २८. अत्यंत धनाढ्य मनुष्य ३२. काळ्या तोंडाचा हुप्प्या ३३. करसेवेचा अपभ्रंश – सेवा ३४. रोग झालेला, आजारी ३५. सारखा ३६. सदोदित ३७. चिवचिवाट ३९. हुबेहुब प्रत बनवणारा ४१. मांडणी, सजावट ४२. शुष्कता ४३. धुणे ४७. धुसफूस ४९. धातूचा धागा ५०. बुजणारी ५१. तारीख ५२. पद्धतीप्रमाणे ५३अ. पाणी ५४. मांडी न घालता बसलेला ५५. नेहमी, वारंवार ५७. खाट, चौपाई ५८. युवराज ६०. सापाची एक जात ६१. आपला नसलेला ६३. बातमीदार ६५. घोडागाडी ६६. धमकी ६७. त्रास, वैताग, बडबड ६९. पाठविलेला ७१. रवाळ ७३. मूळ आधार ७४. तिथीप्रमाणे बदलत जाणारा चंद्राचा आकार ७६. डोळे ७८. हाताचा तळवा ७९. पाप ८०. एकावर एक रचलेल्या वस्तू (उदा. गोवऱ्या, पुस्तके) ८१. पादत्राण

उभे शब्द

१. ठोंब्या माणूस, शंकराचे वाहन २. दुलई ३. नष्ट ४. मृत ५. रमापती ६. जमीनदोस्त ७. तृण ८. द्रव्य, पैसा १०. प्रेत (हिंदी) १२. नूतन १६. भारतीय चलन १७. पाठवणी २०. जमीनदार २१. भूतकाळ २३. सुविधा २४. पाठीतील हाडांच्या माळेतील मणी २६. पुरुष २७. पाताळ २९. न वापरलेला ३०. नसलेला ३१. श्रीरामाचे स्तोत्र ३२. गंध ३४. जाड पोळी ३७. तंबूची कापडी भिंत ३८. साखळी लावलेला दिवा ३९. बोटाच्या टोकावरील आवरण ४०. लक्षाचा आकडा ४२. तापापूर्वीचे शहारे ४४. वेल ४५. फार गार वा उष्ण नसलेले ४६. निर्लज्ज ४८. साठ मिनिटे ५०अ. ढग ५३. चापट, मऊ पदार्थाचा आघात ५४. पार्वती ५४अ. डुक्कर ५६. सुतळीच्या धाग्याचे कापड ५९. मदत ६०. संगीतातील एक राग ६१. झटकन ६२. मनोहरी, रम्य ६४. विरोध ६६. प्रत्येक, किंमत ६७. काळिमा, बट्टा ६८. डाक, पत्र ७०. श्वासाचा अवयव ७२. राक्षस ७५. लत्ताप्रहार ७७. जून्या जखमेची खूण

### शब्दकोडे क्र. 53 चे उत्तर

आडवे उत्तर

१.जरतर ५.अनुवादक ९.राजकुमार १२.वसाहत १३.चरणरज १४.नवीन १६.करवत १८.पाऊस २०.रसद २२.खरडपट्टी २४.सारा २५.कलमा २६.मधुर २८.मोल २९.तापट ३१.वरवर ३२.मदत ३४.साग ३६.वास ३७.कारण ३८.पराभूत ४०.कसाई ४१.कुरापत ४२.कळ ४३.तडीपार ४५.रव ४६.रपेट ४७.काल ४९.खण ५०.नवे ५२.पाप ५३.वाकडातिकडा ५५.जवळजवळ ५७.डमरू ५८.वश ५९.गल ६०.यमक ६२.सरळ ६३.जप ६४.कट ६५.विपरीत ६८.वाडवडील ७०.नकलाकार ७१.नुकसान ७४.पसाभर ७५.सतलज ७६.पड

उभे उत्तर


१.जवळपास २.रसा ३.तह ४.रतन ५.अननस ६.वाचक ७.दर ८.कणखर ९.राज १०.कुमार ११.रडतराऊत १५.वीरमाता १६.कट्टी १७.वसा १९.सकल २१.दमट २२.खरवस २३.डफ्फड २७.समर २८.मोगरा ३०.परकर ३३.दणकट ३४.सापट ३५.कातडी ३६.वाईट ३७अ.कातरवेळ ३९.भूतल ४१.कुरण ४४.पाचक ४७.कापडचोपड ४८.अतिशय ४९.खडाष्टक ५०.नवलपरी ५१.कळकळ ५३.वरुणी ५४.डाव ५५.जग ५६.जवस ६१.मधुकर ६३.जवान ६४.कलप ६५.विकास ६६.परत ६७.तनुज ६९.वळ ७०.नभ ७२.साप ७३.नड

वृत्तविशेष...

## बिग बॉस विजेता जय दुधानेला हनिमूनला जाताना ठाणे पोलिसांनी एअर पोर्टवरून केली अटक

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** बिग बॉस ३ चा विजेता जय दुधानेला ठाणे पोलिसांनी मुंबई विमानतळावरून अटक केलीय. ठाण्यातील वर्तक नगर पोलीस ठाण्यात चार महिन्यांपूर्वी दाखल करण्यात आलेल्या एका फसवणुकीच्या गुन्ह्यात ठाणे पोलिसांनी ही कारवाई केलीय. जय दुधाने हा जीम व्यावसायिक असून, तो फिटनेस ट्रेनर खेळाडू आणि मॉडेलिंगचेदेखील काम करतो. त्याच्या विरोधात दाखल असलेला गुन्हा हा एका मालमत्तेशी संबंधित असून, एक गाळा अनेकांना विकण्याचा हा प्रकार असल्याचं पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांनी सांगितलेय.



गाळा विकल्याचा प्रकार ही अफवा : ''माझ्यावर जो आरोप करण्यात आलाय, ती अफवा कोणी पसरवली माहीत नाही. माझ्यावर लोक उलटले आहेत. लवकरच सत्य काय हे तपासानंतर बाहेर येईल. मी माझा चेहरा लपवणार नाही, कारण हे सगळं प्रकरणच खोटं आहे. माझ्यात हिंमत आहे, मी कोणत्याही प्रकारे गुन्हा केलेला नाही, त्यामुळेच मी या प्रसंगाला सामोरे जाण्याची हिंमत ठेवतो,'' अशी प्रतिक्रिया जयने दिलीय.

करोडोंच्या फसवणुकीचे हे प्रकरण : जय दुधाने आणि त्याच्या कुटुंबीयांवर दाखल असलेला हा गुन्हा काही दिवसांपूर्वी वर्तक नगर पोलीस ठाण्यात दाखल होता. गुन्हा दाखल झाल्यापासून जय दुधाने हा पोलिसांना मिळाला नव्हता. त्याचा शोध घेतल्यानंतर आज त्याची माहिती ठाणे पोलिसांना मिळाल्यावर त्यांनी त्याला मुंबई विमानतळावरून अटक केली. मालमत्तेसंदर्भातील हा गुन्हा असून, यामध्ये खोटी कागदपत्रं तयार करणे आणि फसवणूक करणे या कलमांचा समावेश आहे. अधिक तपास करून पोलीस पुढील कारवाई करणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांनी दिलीय.

## अमरावती मुख्यमंत्र्यांचा रोड शो, महापालिका निवडणूक प्रचाराचा 'श्री गणेशा', पक्ष निरीक्षकांना चालावे लागले पायी

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती महापालिका निवडणूक प्रचाराचा श्री गणेशा रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रोडशोद्वारे सुरू झाला. शहरातील पंचवटी चौक येथून दुपारी दोन वाजता खुल्या जीपमधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अमरावतीकरांना अभिवादन करण्यासाठी निघाले होते.

पंचवटी चौक येथून सुरू झालेला मुख्यमंत्र्यांचा रोड शो हा गाडगे नगर, राठी नगर, शेगाव नाका मार्गे विलास नगर, चौधरी चौक, जयस्तंभ चौक, राजकमल चौक, गांधी चौक, भूतेश्वर चौक, रवीनगर चौक मार्गे साईनगरपर्यंत झाला. मुख्यमंत्र्यांसोबत खुल्या जीपमध्ये जिल्ह्याच्या माजी खासदार नवनीत राणा, भाजपाचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, विधान परिषदेचे माजी सदस्य प्रवीण पोटे, प्रशांत देशपांडे उपस्थित होते. रोड शो दरम्यान मार्गात प्रत्येक चौकात मुख्यमंत्र्यांचं स्वागत करण्यात आलं. प्रत्येक चौकात नागरिकांची गर्दी होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर मार्गे थेट पंचवटी चौकात पोहोचले. यावेळी फटाके बाजवत त्यांचं स्वागत करण्यात आलं. सकाळी नऊ वाजल्यापासूनच पंचवटी चौक येथे भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची गर्दी जमली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्या वाहनातून उतरताच थेट पंचवटी चौक येथे रोड शोसाठी फुलांनी सजवण्यात आलेल्या खुल्या वाहनात चढले आणि थेट रोड शोला सुरुवात झाली.

महापालिका निवडणुकीत भाजपाचे ६८ उमेदवार : अमरावती महापालिका निवडणुकीत ६९ जागांपैकी भाजपाचे एकूण ६८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. महापालिकेत भाजपाला बहुमत मिळावं या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ रोड शो केला. यावेळी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त संपूर्ण शहरात होता.

पक्ष निरीक्षकांना चालावं लागलं पायी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट खुल्या वाहनात चढून रोडशोला सुरुवात केली. यावेळी ठरल्याप्रमाणे त्यांच्या वाहनात अमरावती शहरातील नेते मंडळी चढले. अमरावती महापालिकेसाठी निरीक्षक म्हणून काम पाहणारे जळगाव जामोदचे आमदार आणि माजी मंत्री संजय कुटे हे मुख्यमंत्र्यासोबत खुल्या वाहनात चढण्यापूर्वीच रोड शोला सुरुवात झाली. मुख्यमंत्र्यांच्या वाहनामागे भाजपाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांसाठी आणखी एक खुले वाहन होते. मात्र संजय कुटे यांना मुख्यमंत्र्यासोबत खुल्या वाहनात जायचे असल्याने ते मुख्यमंत्र्यांच्या वाहनापर्यंत धावपळ करत बऱ्याच दूरपर्यंत पाईच चालत निघाले.

# डोणगावमध्ये मोकाट कुत्र्यांची दहशत: पोलीस स्टेशनपर्यंत टोळक्याचा थैमान

### प्रशासनाची उदासीनता, शाळकरी मुलं, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचारी भयभीत

### ग्रामपंचायत व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून तातडीच्या उपाययोजनेची गरज, मेन रोडवर दहशत: नागरिकांचा संताप

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/कार्यालय प्रतिनिधी :** डोणगावच्या मेन रोडवर मोकाट कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांच्या जीवनात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळकरी मुले, कॉलेज विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सामान्य पादचारी टोळक्यांमुळे भयभीत आहेत. पालक मुलांना शाळेत पाठवण्यास घाबरत आहेत, तर काहींना रोज मुलांची ने-आण करावी लागत आहे. सकाळ-सायंकाळी टोळक्याने गँगसारखी हालचाल करत रस्त्यावर धाव घेणे, भुंकणे आणि पाठलाग करणे सामान्य झाले आहे. नागरिकांचे म्हणणे आहे: ''एक गंभीर अपघात होण्याआधी प्रशासनाने कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे.''

सार्वजनिक ठिकाणी मोकाट कुत्र्यांची नोंद ठेवणे; कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी मोहिमा राबवणे; नागरिकांच्या तक्रारी वेळेत प्रशासनास कळवणे

### विशेष: पोलीस स्टेशनलाही कुत्र्यांचा थैमान!

डोणगाव पोलीस स्टेशनच्या गेटवर चक्क मोकाट कुत्र्यांचा जमाव पाहायला मिळाला. पोलीस स्टेशनसारख्या सुरक्षित समजल्या जाणाऱ्या ठिकाणीही कुत्र्यांचे टोळके बसले होते. नागरिक म्हणाले: ''जेथे नागरिक संरक्षणासाठी जातात, त्या पोलीस स्टेशनच्या प्रवेशद्वारावरच कुत्र्यांची दहशत असेल, तर सामान्य नागरिकांना सुरक्षिततेची अपेक्षा कुणाकडून करावी?'' या घटनेने प्रशासनाच्या उदासीनतेवर थेट प्रश्नचिन्ह उभे केले आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की मोकाट कुत्र्यांवर तातडीने उपाययोजना करणे प्रशासनाचे प्राथमिक कर्तव्य आहे. ''जर लवकर कारवाई झाली नाही, तर नागरिक आंदोलनही होऊ शकते,'' असे इशारे नागरिकांनी दिले आहेत.






नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करणे; मोकाट कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी योजना राबवणे; अपघात किंवा प्रकोप टाळण्यासाठी तातडीची ग्रामपंचायत प्रशासनाने उपाययोजना व कारवाई करणे आवश्यक

**पशुवैद्यकीय अधिकारी**

कुत्र्यांचे आरोग्य तपासणे आणि लसीकरण करणे; दुरुस्त किंवा अपायकारक कुत्र्यांना सुरक्षित रीतीने हाताळणे; सार्वजनिक ठिकाणी मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करणे सध्याची परिस्थिती: संबंधित प्रशासनाकडे शाळा, रस्ते आणि पोलीस स्टेशनसारख्या ठिकाणी कुत्र्यांचा नियंत्रण नसल्याने नागरिक भयभीत आहेत. तातडीने कारवाई करणे आवश्यक, अशी नागरिकांची मागणी आहे.

**तात्काळ उपाययोजना आवश्यक नागरिकांची मागणी**

मोकाट कुत्र्यांवर तातडीने नियंत्रण ठेवावे, पकड मोहीम राबवावी, आणि भविष्यातील अपघात टाळण्यासाठी कायमस्वरूपी नियोजन करावे. ''आज आवाज न उठवला तर उद्या उशीर होईल,'' असे इशारे स्थानिक नागरिकांनी दिले आहेत. डोणगाव बोलतंय प्रशासन ऐकणार आहे का?

## मुलाच्या ग्रॅच्युईटी रक्कमेवरून सासू-सुनेत वाद; सासूने बॉयफ्रेंडच्या मदतीने सुनेचा केला 'गेम'

**ठाणे/प्रतिनिधी :** मुलाच्या ग्रॅच्युईटीच्या १० लाख रुपयांच्या वादातून सासूनं बॉयफ्रेंडच्या मदतीनं सुनेचा गेम केल्यानं मोठी खळबळ उडाली. पुरवा नष्ट करण्यासाठी सासूनं बॉयफ्रेंडच्या मदतीनं सुनेचा मृतदेह घरापासून दोन किलोमीटर लांब असलेल्या एका रेल्वे पुलाखाली फेकल्याचं पोलीस तपासात समोर आलं. ही घटना कल्याण पूर्व कर्पेवाडीतील एका घरात घडली. याप्रकरणी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात हत्येसह पुरावा नष्ट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी मारेकरी सासू आणि तिच्या बॉयफ्रेंडला बेड्या ठोकल्या आहेत. लताबाई नाथा गांगुर्डे (वय ६०, रा. कर्पेवाडी, कोळसेवाडी, कल्याण पूर्व) आणि जगदीश महादेव म्हात्रे ( वय ६७, रा. वरपगाव, कल्याण) असं अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावं आहेत. तर रुपाली विलास गांगुर्डे ( वय ३५ ) असं हत्या झालेल्या सुनेचं नाव आहे.

## प्रमिला केणींसाठी आमदार जितेंद्र आव्हाड मैदानात

**ठाणे/प्रतिनिधी :** कळवा येथील प्रभाग क्रमांक २३ मध्ये माजी विरोधी पक्ष नेत्या प्रमिला केणी यांना शिंदे सेनेने उमेदवारी नाकारली. यामुळे त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. परंतू, त्यांना या प्रभागात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षातर्फे पुरस्कृत उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आले. त्यांचा प्रचार करण्यासाठी स्वत: जितेंद्र आव्हाड मैदानात उतरले. ठाणे महापालिका निवडणुकीच्या काही महिने आधी माजी नगरसेवक मिलींद पाटील यांच्यासह सहा ते सात नगरसेवकांनी राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेना (शिंदे गट) पक्षात प्रवेश केला होता. यामध्ये माजी नगरसेविका प्रमिला केणी आणि त्यांचे पुत्र मंदार केणी यांचाही समावेश होता. कळव्यातील प्रभाग क्रमांक २३ मधून प्रमिला केणी आणि त्यांचे दिवंगत पती मुकूंद केणी हे निवडून येत होते. मुकूंद केणी यांच्या निधनानंतर त्यांच्या जागेवर मंदार केणी हे निवडणुक लढण्याची तयारी करीत होते. यामुळे शिवसेना (शिंदे गट) पक्षाकडून त्यांना दोन तिकीटे मिळतील अशी आशा होती. प्रत्यक्षात मंदार केणी यांनाच पक्षाने उमेदवारी दिली तर, प्रमिला केणी यांना उमेदवारी दिली नाही. त्यामुळे त्यांनी अपक्ष अर्ज दाखल केला होता. त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घ्यावा यासाठी शिंदेची सेना प्रयत्न करीत असतानाच, राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाने त्यांना पुरस्कृत केले असून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या उमेदवार दिपा गावंड यांनी आपला अर्ज मागे घेतला आहे. यामुळे प्रमिला केणी यांना राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाने बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. प्रमिला केणी यांचा प्रचार करण्यासाठी आमदार जितेंद्र आव्हाड स्वत: मैदानात उतरले असून जनतेला प्रमिला केणी यांना भरघोस मतदान करा असे आवाहन केले.

# मलकापूरात संघटित गुन्हेगारीवर मोठा आघात

- ९ सराईत गुन्हेगारांवर मोक्का अंतर्गत कारवाई
- पोलिस अधीक्षक नितीन तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली धडक कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**मलकापूर/प्रतिनिधी :** मलकापूर शहर व परिसरात वाढत चाललेल्या संघटित गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बुलढाणा जिल्हा पोलिसांनी मोठी कारवाई करत ९ सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम १९९९ (मोक्का) अंतर्गत कारवाई केली आहे. या कठोर कारवाईमुळे शहरात दहशत माजवणाऱ्या गुन्हेगारी टोळीला मोठा धक्का बसला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक बुलढाणा नितीन तांबे यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तसेच अपर पोलीस अधीक्षक श्रीकांत पांडव, उपविभागीय पोलीस अधिकारी (मलकापूर) सुमित माळी यांच्या देखरेखीखाली संपूर्ण तपास व प्रस्ताव प्रक्रिया पार पडली. मलकापूर पोलीस स्टेशन हद्दीत खूनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दरोडा, घरफोडी, मारहाण, गंभीर दुखापत, धमकी व अवैध वसुली यांसारख्या





गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये सातत्याने सहभागी असलेल्या आरोपींविरोधात ही कारवाई करण्यात आली.

या गुन्हेगारांच्या कारवायांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन व मालमत्ता धोक्यात आली होती. मलकापूर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या विविध गुन्ह्यांची सखोल छाननी करून पोलीस निरीक्षक (स्थानीय गुन्हे शाखा) मलकापूर यांनी मोक्का अंतर्गत प्रस्ताव तयार केला. सदर प्रस्तावास वरिष्ठ स्तरावर मंजुरी मिळाल्यानंतर आरोपींविरोधात मोक्का लागू करण्यात आला.

मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आलेल्या आरोपींमध्येरोशन उर्फ बंटी उर्फ राकेश मोर, साईफुल्ला उर्फ सादिक पठाण, आदित्य उर्फ बाबू साळवे, अमोल उर्फ गोट्या माने आदित्य आनंद बनसोडे, गणेश सोनटक्के, प्रशांत उर्फ पप्पू माने, रोहित उर्फ कालू पाटील आणखी एक सराईत आरोपी यांचा समावेश आहे.


ही कारवाई पोलीस निरीक्षक मलकापूर, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस कर्मचारी तसेच स्थानिक गुन्हे शाखा यांच्या संयुक्त प्रयत्नातून यशस्वी झाली. या कारवाईमुळे मलकापूर शहरात संघटित गुन्हेगारीवर नियंत्रण मिळण्यास मदत होणार असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलिस प्रशासन कटिबद्ध असल्याचे पोलीस अधीक्षक नितीन तांबे यांनी स्पष्ट केले आहे.

# ज्ञानगंगेच्या जंगलात नवा पाहुणा! पेंचमधील वाघ PKT7CP1 चे यशस्वी स्थलांतर

### PKT7CP1 च्या स्थलांतरामुळे जैवविविधतेत भर; महामार्गावरील वाहनधारकांसाठी कडक नियम





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मध्यप्रदेशातील पेंच व्याघ्र प्रकल्पातून ३५ महिन्यांचा वाघ बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यात यशस्वीपणे स्थलांतरित करण्यात आला आहे. PKT7CP1 असे नाव देण्यात आलेल्या या वाघाच्या आगमनामुळे ज्ञानगंगा अभयारण्याच्या जैवविविधतेला नवे बळ मिळाले असून वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची आणि सकारात्मक घडामोड मानली जात आहे.

वन्यजीव विभागाच्या तज्ज्ञ पथकाच्या देखरेखीखाली हा संपूर्ण स्थलांतर प्रकल्प राबविण्यात आला. वाघाच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून त्याच्या गळ्यात रेडिओ कॉलर बसविण्यात आला आहे. वाघाचे आरोग्य पूर्णतः सुरक्षित असून त्याचे वर्तन नैसर्गिक असल्याची माहिती वन्यजीव अधिकाऱ्यांनी दिली आहे.

ज्ञानगंगा अभयारण्यामधून बुलढाणाखामगाव हा महत्त्वाचा महामार्ग जात असल्याने वाहनधारकांसाठी विशेष सूचना जारी करण्यात आल्या आहेत. वाघासह इतर वन्यप्राणी रस्त्यावर येण्याची शक्यता लक्षात घेता, वाहनांचा वेग मर्यादेत ठेवणे, अनावश्यक हॉर्न न वाजवणे, रात्रीच्या वेळी विशेष काळजी घेणे तसेच रस्त्यावर थांबून फोटो किंवा व्हिडीओ काढणे टाळावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.वन्यजीव विभागाने नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही दिला आहे.

या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून गस्त आणि पेट्रोलिंग वाढविण्यात आली आहे. नागरिकांची सुरक्षितता आणि वन्यजीवांचे संरक्षण हे विभागाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, या वाघाच्या आगमनामुळे स्थानिक नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून ज्ञानगंगा अभयारण्याच्या पर्यटनमूल्याला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. मात्र पर्यावरण संतुलन आणि वन्यजीव संवर्धनासाठी नागरिकांनी व प्रवाशांनी जबाबदारीने वागणे आवश्यक असल्याचे वन विभागाने पुन्हा अधोरेखित केले आहे.